make food
affordable for
everyone /
إجعل طعام
بأسعار معقولة
لكل أشخاص /
在公园和公交
上的长椅上放
置毛绒座 / put
plush seats
on park and
bus benches
/ idøm folk,
der smider
affald fra sig, en bøde /
לבנות שירותים ציבוריים נקיים /
มีโครงการศิลปินพานักในสวน
สาธารณะทุกแห่ง / werk en
woon
in de-
zelfde
gemeen-
schap /
create more
comfortable
shelters for
the homeless
population /
tocar música clásica
en el metro / فواره های
بیشتری نصب کنید /
hupen durch Gesetze un-
terbinden /
parlez avec
l'étranger à
côté de vous /
छतबगीचों द्वारा
बारिश के पानी
को जमा करना /
Avere più
eventi artistici
gratuiti per
tutti / 歩行者用
の通りと自転
車専用道路
を、全部道路
より高く建設
する / plant
fruit-bearing
trees at street
level / altyapı
sistemlerini
tamamen ye-
niden tasar-
layarak /
ṣẹ̀dá bọ́sì tí
àwọn èrò ọkọ̀
ṣatọ́kùn rẹ̀ /
रस्त्याच्या काठे
ला फळझाडे
लावणे / create
buses that
are powered
by the pas-
senger /
ustawmy
wokół miasta
więcej kosz-
ów na re-
cyklizację /
criar arte pú-
blica em áreas
negligenciadas /
给无家可归的人提
供更多的庇护
所 / расши-
рить пеше-
ходные зоны /
dùng kỹ thuật
để tạo ra các
dạng thức mới về
sự cam kết
của công dân
/ build under-
ground instead of
above ground /
뜻밖의 장소에 작은
쉼터를 만들자

**BMW GUGGENHEIM LAB**

**News Release**

# बीएमडब्ल्यू गुगेनहाइम लॅबने शहरातील सर्वात व्यस्त वाहतूक केंद्राच्या पुनर्नवीकरणाचा विचार करणाऱ्या स्पर्धेतील विजेत्या डिझाईन्सचे अनावरण केले

## खुल्या आवाहनातून कला नगर ट्रॅफीक जंक्शन येथे होणाऱ्या ट्रॅफीकच्या खोळंब्याकरिता अंमलात आणण्याजोग्या उपाययोजना समोर आल्या

**मुंबई, १८ जानेवारी २०१३:** बीएमडब्ल्यू गुगेनहाइम लॅबने मुंबई एन्व्हायर्नमेंटल सोशल नेटवर्क (एमईएसएन) च्या संयुक्त विद्यमाने "रिथिंकींग कला नगर ट्रॅफीक जंक्शन"च्या विजेत्यांची घोषणा केली. लॉर्ड कल्चरल रिसोर्सेसच्या देखरेखीखाली आयोजित करण्यात आलेल्या आणि नोव्हेंबर २०१२ मध्ये दाखल करण्यात आलेल्या या स्पर्धेमध्ये मुंबईतील रहदारीची समस्या असलेल्या वाहतूक केंद्राचे पुनर्निर्माण करण्यासाठी अभिनव कल्पना मागवण्यात आल्या होत्या. या स्पर्धेमध्ये अर्जदारांना जंक्शनवरील वाहतूकीच्या गुंतागुंतीचा प्रवाहाच्या समस्येवर मार्ग शोधण्यास सांगण्यात आले होते आणि त्या जंक्शनच्या पुनर्निर्माणाकरिता कल्पना सुचवण्यास सांगण्यात आले होते, ज्या मुंबईतील प्रत्येक वाहतूक केंद्राला लागू केल्या जाऊ शकतील. ही स्पर्धा म्हणजे सर्व मुंबईकरांच्या दैनंदिन आयुष्यात सुधारणा करण्यात हातभार लावण्यात मदत करणाऱ्या सार्वजनिक जागांच्या वाढत्या गरजांचा मुंबई लॅबने घेतलेल्या शोधाचा एक भाग होती.

या स्पर्धेच्या विजेत्यांची निवड स्थानिक आणि आंतरराष्ट्रीय पातळीवरील तज्ज्ञांच्या ज्युरी मंडळाने केली, ज्यात लॅबच्या सल्लागार समितीचे सदस्य एन्रीक पेनालोझा (बोगोटाचे माजी महापौर) आणि गीतम तिवारी (परिवाहन तज्ज्ञ) यांचा समावेश होता. तसेच ज्युरी मंडळावर श्री. विवेक फणसाळकर ( जॉईंट कमिशनर पोलिस, वाहतूक), श्री. पीआरके मूर्ती (मुंबई मेट्रोपॉलिटन रिजन रिडेव्हलपमेंट ऑथोरिटी (एमएमआरडीए) च्या वाहतूक विभागाचे मुख्य), श्री. शिरीष पटेल

**Advisory Committee**
Daniel Barenboim
Elizabeth Diller
Nicholas Humphrey
Muchadeyi Ashton Masunda
Enrique Peñalosa
Juliet Schor
Rirkrit Tiravanija
Geetam Tiwari
Wang Shi

**Solomon R.**
**Guggenheim Foundation**
345 Hudson Street, 12th floor
New York, NY 10014
Phone +1 212 423 3500

bmwguggenheimlab.org

(नागरी विचारतज्ज्ञ आणि सिव्हील इंजिनीयर), सौ. तस्नीम मेहता (डॉ. भाऊ दाजी लाड म्युझियमच्या संचालक विश्वस्त आणि संचालिका), श्री. अशोक दातार (अर्थतज्ज्ञ), बीएमडब्ल्यू गुगेनहाइम लॅबचे क्युरेटर डेविड वॅन डीर लीअर आणि नेविल मार्स आणि तृप्ती अम्रितवार वैतला या मुंबई लॅब टीमच्या सदस्यांचा समावेश होता.

कला नगर ट्रॅफीक जंक्शनचा चेहरामोहरा बदलण्याचे काम हाती घेणार असलेल्या आणि मुंबईतील मुख्य शहर एजन्सींपैकी एक असलेल्या मुंबई मेट्रोपॉलिटन रिजन रिडेव्हलपमेंट ऑथोरिटी (एमएमआरडीए) च्या वाहतूक विभागाचे प्रमुख पीआरके मूर्ती म्हणाले, “या स्पर्धेकरिता आलेले सर्वच अर्ज अतिशय सर्जनशील आणि वास्तवात आणण्याजोगे होते. त्यातून एखादे डिझाईन राहणीमानावर कसा प्रभाव टाकू शकते आणि शहरातील नागरी आरामदायीपणामध्ये कशी सुधारणा घडवून आणू शकते, याचा प्रत्यय येत होता. येत्या काही वर्षांमध्ये वेगवेगळ्या टप्प्यांतील अंमलबजावणीमध्ये स्पर्धेतील निवडक अर्जांमधील काही घटकांची अंमलबजावणी करण्याचा एमएमआरडीए विचार करत आहे.”

वाहतूक विभागाचे जॉईंट पोलिस कमिशनर श्री. विवेक फणसाळकर म्हणाले, “सर्वसाधारण तत्वावर सार्वजनिक जागांचे इष्टतमीकरण करण्याच्या दृष्टीने राबवला गेलेला आणि खासकरुन कला नगर ट्रॅफीक जंक्शनवरील वाहतुकीत सुधारणा घडवून आणणाऱ्या या पुढाकाराचे आम्ही स्वागतच करतो. या महत्वपूर्ण उपक्रमाबद्दल मी बीएमडब्ल्यू गुगेनहाइम लॅबचे अभिनंदन करतो आणि आशा करतो की आम्हाला काही विजेत्या अर्जांना साहाय्य करायला मिळून त्यांच्या अंमलबजावणीला प्रोत्साहन देता येईल. ”

बीएमडब्ल्यू गुगेनहाइम लॅबचे क्युरेटर डेविड वॅन डीर लीअर म्हणाले, “आलेले अर्ज आणि डिझाईन आणि अर्बन प्लॅनिंगच्या क्षेत्रात काम करणारे विद्यार्थी व व्यावसायिक यांच्याकडून मिळालेल्या भरघोस प्रतिसादाने आम्ही उत्साहीत झालो आहोत. ही डिझाईन स्पर्धा आयोजित करण्याची आणि मुंबईतील महत्वपूर्ण जागांच्या पुनर्नवीकरणातील पहिल्या टप्प्यांकरिता वास्तववादी आणि प्रयोगशील उपाययोजना राबवण्यात एमएमआरडीएबरोबर काम करण्याची संधी मिळाल्याबद्दल लॅब कृतज्ञ आहे. ”

निवड समितीने व्यावसायिक वर्गवारीत तीन विजेते आणि विद्यार्थी वर्गवारीत दोन विजेते जाहीर केले. दोन्ही वर्गवाऱ्यांमधील पीपल्स चॉईस पुरस्कारांची निवड कला नगर जंक्शनचा स्कायवॉकवरील लोक आणि डॉ. भाऊ दाजी लाड म्युझियम मधील लॅबला भेट देणारे दर्शक मिळून ३०० व्यक्तींनी केली.

निवडलेल्या पाच डिझाईन्समध्ये:

- कु. मयुरी सिसोदिया आणि श्री. कल्पित अशर, व्यावसायिक वर्गवारी
- कु. श्वेता परब आणि श्री. हृषिकेश मोरे, व्यावसायिक वर्गवारी
- कु. राधिका माथुर, व्यावसायिक वर्गवारी

**Solomon R.**
**Guggenheim Foundation**
345 Hudson Street, 12th floor
New York, NY 10014
Phone +1 212 423 3500

bmwguggenheimlab.org

- डॉ. डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ आर्कीटेक्चर-कु. श्रीशा आरोंदकर, कु. गार्गी ठाकूर, कु. पूजा कुडाले, कु. अनया पाटिल, कु. स्नेहल सोनावणे, कु. अस्मिता राय आणि कु. सायली पोतनीस, विद्यार्थी वर्गवारी
- श्री. आंद्रे पारेझ आणि ग्रुप, विद्यार्थी वर्गवारी
- —-, पीपल्स चॉईस वर्गवारी

मुंबईतील वाहतुकीच्या वैशिष्टयपूर्ण स्वरुपाला स्पर्धकांनी दिलेल्या प्रतिसादांची ज्युरींनी वाहवा केली. सिग्नल्स, सिनेज आणि प्रकाशयोजना यांच्या सुधारीत सुस्पष्टतेच्या तातडीच्या गरजांची पूर्तता करणे, हरित जागा आणि अस्तित्वातील नैसर्गिक पर्यावरण यांचे संवर्धन, शहराच्या मार्गदर्शक तत्वांच्या अंतर्गत प्रस्तावाच्या अंमलबजावणीतील सहजता; सुधारित बस लेन्स, बसमध्ये चढण्या–उतरण्यातील सहजता; सुस्पष्ट आखलेल्या ट्रॅफीक लेन्स; पावसाचे पाणी साठवणे आणि त्याच्या पुनर्वापराची सुरुवात; आणि गोंगाटाची पातळी यावर उपाययोजना म्हणून व्यावसायिक वर्गवारीतील काही अर्जांची नोंद करण्यात आली आहे. विद्यार्थी वर्गवारीत निवडल्या गेलेल्या प्रस्तावांमध्ये सायकलींचा वापर, सुधारीत सिग्नल प्रकाशयोजना आणि अस्तित्वातील उड्डाणपुलाच्या खालील जागेचा उत्तम वापर यांवर भर दिलेला दिसत होता. स्पर्धेविषयीच्या अधिक माहितीकरिता लॅबच्या वेबसाईटला भेट द्या.

व्यावसायिक वर्गवारीत ७०,००० भारतीय रुपयांचे आणि विद्यार्थी वर्गवारीत २०,००० भारतीय रुपयांचे बक्षिस प्रदान करण्यात आले. “पीपल्स चॉईस विजेत्या”ला अतिरिक्त १५,००० भारतीय रुपयांचे बक्षिस मिळणार आहे.

व्यावसायिक वर्गवारीकरिता निवडल्या गेलेल्या अर्जांमध्ये

- श्री. निखिथ अशोक
- आर्कीटेक्ट साबू फ्रान्सिस अँड असोसिएट्स
- आयडियो इनोव्हेशन अँड डिझाईन प्रा. लि.
- श्री. अमित करंबेळकर आणि श्री. निनाद पाटिल
- मॉर्फोजेनेसिस
- ईएचडीडी-श्री. समिर शेख
- श्री. गौरच सरदाना, कु. प्राची दोंदे आणि कु. पलक कोठारी

ज्युरींनी विद्यार्थी वर्गवारीत खालील अर्जाची देखील निवड केली

- कु. वेदिका तुलसियान, श्री. जयनिश शहा आणि श्री. करण संचेती

कला नगर ट्रॅफीक जंक्शन हे मुंबईतील सर्वात गजबजलेले आणि सार्वजनिक जागेच्या दृष्टीने पाहायचे झाले तर सर्वात आव्हानात्मक जागा आहे. ही जागा पाच मुख्य वाहतूक मार्गांच्या माध्यमातून या बेटावर वसलेल्या शहराला मुंबईतील पश्चिम उपनगरांशी जोडते. या जंक्शनवरील वाहतूक ही शहरातील सर्वात व्यस्त वाहतूक म्हणून गणली जाते जिथे

**Solomon R.
Guggenheim Foundation**
345 Hudson Street, 12th floor
New York, NY 10014
Phone +1 212 423 3500

bmwguggenheimlab.org

वाहतुकीच्या व्यस्त वेळात महामार्गाच्या उड्डाणपुलाच्या वर आणि खाली प्रत्येक तासाला ६०,००० प्रवासी प्रवास करतात. लेन्सचा बेशिस्त वापर, रस्त्याच्यामध्ये चालणारे पादचारी, बेकायदेशीर पार्कींग आणि प्रवाशांना चढउतार करण्यासाठी असणारे थांबे यांमुळे वाहतुकीच्या खोळंब्यात भरच पडते. संशोधनातून असेही समोर आले आहे की या जंक्शनला जोडणारा पश्चिम द्रुतगती मार्ग हा त्यावर झालेल्या अपघातांना पाहता दहा सर्वात धोकादायक रस्त्यांपैकी एक म्हणून गणला जातो.

**बीएमडब्ल्यू गुगेनहाइम लॅब बाबत:**

सोलोमन आर. गुगेनहाइम फाऊंडेशन आणि बीएमडब्ल्यू ग्रुप यांचा बीएमडब्ल्यू गुगेनहाइम लॅब हा एक संयुक्त विद्यम आहे. बीएमडब्ल्यू गुगेनहाइम लॅबची स्थापना डेव्हिड व्हॅन डेर लीर आणि मारिया निकोनोर या सोलोमन आर गुगेनहाइम म्युझियमच्या सदस्यांनी केली आहे. शहरी विचारकेंद्राचा एक भाग आणि एक कम्युनिटी सेंटरचा भाग तसेच लोकांना जमा होण्यासाठी सार्वजनिक ठिकाण असलेले बीएमडब्ल्यू गुगेनहाइम लॅब हा एक जागतिक उपक्रम आहे. त्याचे उद्दिष्ट हे महत्त्वाच्या नागरी आव्हानांचा विचार करणे आणि जगभरातील शहरांमध्ये संवाद यंत्रणा उभारणे आहे. लॅब साइट्समधील कार्यक्रमांमध्ये सहभागी होण्याबरोबरच लोकांना (@BMWGuggLab आणि #BGLab), Facebook, YouTube, Flickr आणि Foursquare, तसेच subscribe येथे जाऊन लॅबच्या न्यूजलेटरमध्ये अद्ययावत प्रकल्प पाहता येतील.

**एमईएसएन विषयी**

मुंबई एन्वॉर्यन्मेंटल सोशल नेटवर्क (एमईएसएन) या नोंदणीकृत विना-सरकारी संस्थेची स्थापना २००५ मध्ये करण्यात आली. एमईएसएन ही मुंबईतील रहदारी नियम व व्यवस्थापनाच्या प्रती समर्पित आहे. अधिक जाणण्याकरिता mesn.org. वर भेट द्या.

**लॉर्ड कल्चरल रिसोर्सेस विषयी**

लॉर्ड कल्चरल रिर्सोसेस जगभरामध्ये सांस्कृतिक भांडवल उभारण्याप्रती समर्पित वैश्विक व्यावसायिक उद्यम आहे. अधिक माहितीसाठी lord.ca/india. वर भेट द्या.

संपूर्ण प्रेस मटेरियलसाठी बघा bmwguggenheimlab.org/presskits
पब्लिसिटी चित्रांसाठी पहा bmwguggenheimlab.org/pressimages
पब्लिसिटी व्हिडिओंसाठी पहा bmwguggenheimlab.org/pressvideos
यूजर आयडी = photoservice, पासवर्ड = presspass

संपर्क
मुंबई:
झीनत दुबेरिया, रुदर फिन इंडिया
+ 91 916 7577 467 / duberiaz@ruderfinnasia.com

**Solomon R. Guggenheim Foundation**
345 Hudson Street, 12th floor
New York, NY 10014
Phone +1 212 423 3500

bmwguggenheimlab.org

आंतरराष्ट्रीय:
कॅट लायडेकर, पोल्स्कीन आर्टस् अॅन्ड कम्युनिकेशन्स काऊंसेलर्स
+ 1 212 715 1602 / lydeckerk@finnpartners.com

बीएमडब्ल्यू-संबंधित चौकशीकरिता:
अभय डांगे, प्रेस अॅन्ड कॉर्पोरेट अफेयर्स, बीएमडब्ल्यू इंडिया
+ 91 124 4566 656 / Abhay.Dange@bmw.in

१८ जानेवारी २०१३
#1282/BGL26